**पदस्थापना देणेबाबत.**
**डॉ. वंदना हेडावू,**
**पशुधन विकास अधिकारी, गट-अ.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन आदेश क्रमांक : पसंप्र-२०१७/प्र.क्र.२३६/पदुम-१**
५ वा मजला विस्तार, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- ३० मे, २०१८.

**शासन आदेश** :-

डॉ.वंदना हेडावू , पशुधन विकास अधिकारी, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, आमगांव, जि. गोंदीया यांची बदली दि.३१.५.२०१७ च्या आदेशान्वये पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, गोंदीया येथे करण्यात आली आहे. सदर बदली आदेशाविरुध्द डॉ.हेडावू यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेला मूळ अर्ज क्र. ७६६/२०१७ मध्ये मा. प्राधिकरणाने दि.०७.१०.२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार, दि.५/१२/२०१७ च्या शासन पत्रान्वये डॉ. वंदना हेडावू यांना दि. ३१/५/२०१८ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आली आहे. डॉ. हेडावू यांचा दि.५ मे २०१८ रोजी कार्यरत पदावरील ६ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असल्याने त्या आंतर विभागीय बदलीस पात्र आहेत. ही बाब विचारात घेता डॉ. वंदना हेडावू यांनी दिलेला बदली विकल्प व मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ, नागपूर यांचे आदेश विचारात घेऊन त्यांची खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.४ मध्ये नमूद ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्याचे नांव** | **दि.३१/५/२०१७ च्या आदेशान्वये दिलेली पदस्थापना.** | **सुधारीत पदस्थापनेचे ठिकाण.** |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३.** | **४.** |
| १. | डॉ.वंदना हेडावू, पशुधन विकास अधिकारी, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, आमगांव, जि. गोंदीया | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, गोंदीया | पशुधन विकास अधिकारी (गट-अ), फिरता पशुवैद्यकीय दवाखाना, वैभववाडी, जि.सिंधुदूर्ग (रिक्त पदावर) |

२. संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी पर्यायी व्यवस्था करुन डॉ. वंदना हेडावू यांना कार्यरत पदावरुन तातडीने कार्यमुक्त करावे. तसेच डॉ. हेडावू यांनी वरीलप्रमाणे पदस्थापनेच्या पदावर विनाविलंब रुजू व्हावे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०५३११४१४१२४००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vinod Sopanrao Mendhe

Digitally signed by Vinod Sopanrao Mendhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3dfd984bb7c5aede090473e34b1c93fa9f36d97d56c0cf07812a43c5ca5d6a24, cn=Vinod Sopanrao Mendhe
Date: 2018.05.31 14:13:48 +05'30'

**( वि.सो.मेंढे )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत :**

१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-०७.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदीया/सिंधुदूर्ग.

३. सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) पुणे.
४. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, मुंबई/नागपूर.
५. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, गोंदीया/सिंधुदूर्ग.
६. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदीया/सिंधुदूर्ग.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदीया/सिंधुदूर्ग.
८. संबंधित पशुधन विकास अधिकारी द्वारा आयुक्त पशुसंवर्धन, म.रा.पुणे.
९. निवड नस्ती.